**S.N.D.T. Women's University**
1, Nathibai Thackersey Road,
New Marine Lines, Churchgate,
MUMBAI - 400 020.
Phone : + 91 22 2203 1879

A+ Grade (CGPA 3.27)

**श्रीमती ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठ**
१, नाथीबाई ठाकरसी मार्ग, न्यु मरिन लाईन,
चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.
Website : sndt.ac.in

# परिपत्रक

ऑफी.जन/परिपत्रक /२०२६ -२७ / 1519

दिनांक: १० सप्टेंबर २०२६

**विषय: शैक्षणिक वर्ष २०२७ -२८ करिता नवीन पाठ्यक्रम/ नवीन विद्याशाखा/ नवीन विषय/ अतिरिक्त तुकडी करिता अर्ज मागविण्याबाबत.**

सर्व संबंधितांच्या माहितीसाठी सूचित करण्यात येते की, एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई द्वारे महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ च्या कलम १०९ (४) मधील तरतुदीनुसार शैक्षणिक सत्र २०२७ -२८ या कालावधी करिता नवीन पाठ्यक्रम/ नवीन विद्याशाखा/ नवीन विषय/ अतिरिक्त तुकडी अभ्यासक्रमाकरिता इच्छुक संस्था/ महाविद्यालयांकडून **३० सप्टेंबर, २०२६** पर्यंत प्रस्ताव केवळ ऑनलाईन पद्धतीने मागविण्यात येत आहेत.

उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. मान्यता - २०२५/ई-१३१९८७८/मशि-४, दिनांक १८ सप्टेंबर, २०२५ मध्ये नमूद निकष व कार्यपद्धती, संलग्नता शुल्क व इतर माहिती विद्यापीठाचे https://sndt.ac.in/downloads/affiliation/ या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

प्रस्ताव शासनाच्या New College Permission System (NCPS) नुसार https://htedu.maharashtra.gov.in/NCPS या ऑनलाइन प्रणालीद्वारे सादर करावेत.

प्रस्ताव दाखल करणाऱ्या महाविद्यालयीन प्रशासनाने सोबत जोडलेल्या **शासन निर्णयातील निकष आणि विद्यापीठाचे पात्रता निकषांचे** गांभीर्याने अवलोकन करावे. अर्ज दाखल करण्यापूर्वी पात्रता निकषांची (Eligibility Criteria) पूर्तता होत असल्याबाबत खातरजमा करावी. पात्रता निकषांची पूर्तता न करणाऱ्या प्रस्तावांवर कार्यवाही करण्यात येणार नाही.

प्रस्ताव ऑनलाईन दाखल केल्यानंतर संबंधित महाविद्यालयांनी प्रस्तावाची ०१ हार्डकॉपी विद्यापीठाच्या संलग्नता विभागात ०३ दिवसांच्या कालावधीत Speed post, Courier अथवा Hand deliveryद्वारे संलग्नता शुल्कासहित जमा करणे बंधकारक राहिल..

**प्रस्ताव ऑफलाईन स्वीकारण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.**

AICTE/PCI व NCTE द्वारे मान्यता देण्यात येणारे अभ्यासक्रम वगळता विद्यापीठाकडे सध्या सुरू असलेल्या अभ्यासक्रमांबाबतचे प्रस्ताव दाखल करावेत.

प्रा. (डॉ). निलेश ठाकरे 10/9/26
अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
संलग्नता विभाग (अतिरिक्त कार्यभार)

सोबत : १. शासन निर्णय क्र. मान्यता – २०२५/ई-१३१९८७८/मशि-४, दिनांक १८ सप्टेंबर, २०२५.
२. विद्यापीठाचे पात्रता निकष (Eligibility Criteria)
३. संलग्नता शुल्क

C:\Users\ADMIN\Desktop\PRACHI\VC ORDER\PRACHI\paripatrak\paripatrak.docx

# Eligibility Criteria

1. If the college has applied for many programmes, permissions can be given for maximum three programmes at a time.
2. At least one batch of UG should pass out before giving a PG programme.
3. At least one batch of the existing program should pass out before giving a new program.
4. No PG programme to be given if the institute is not offering the UG Programme in that subject.
5. If the program is not offered by the University it cannot be given.
6. For additional division a trend of no. of applications in the last year has to be established indicating requirement of additional division. No. of applications should be 150% of the intake.
7. A programme may be given approval other than the programmes which require permission from Apex bodies.
8. If the institution is already established for more than 5 years then "NAAC Accreditation" will be mandatory.

P.S. Wakpainjan
14/9/22

(Dr. Pradnya Wakpainjan)
Affiliation Section (Addl. Charge)

Scanned with OKEN Scanner

**SHREEMATI NATHIBAI DAMODAR THACKERSEY**
**WOMEN'S UNIVERSITY**
**MUMBAI – 400020.**

Aff.Gen.1/Circular '2022-23/ 2995 13 January, 2022

**CIRCULAR:**

To all principal/In-charge principal's of Affiliated Colleges,

With reference to University circular dated 10th January, 2023 regarding to invite application for New Faculty Course Subject/Addl. Division from the A.Y. 2023-24 we would like to bring to your kind notice that, as per resolution passed by Board of Deans in its meeting dated 13.01.2023 following amendments has been approved in the Eligibility Criteria for applying New Course is as below:

Earlier of Eligibility criteria point no. 3 :-
**"at least one batch of existing programme should pass out before giving a new programme".**

Now amendment made in point no. 3 of Eligibility Criteria is as below;
**"The existing college/New college permitted to apply for maximum 3 courses in first three years only."**

The eligible Colleges shall apply according to new amendment in prescribed time limit.

(Sd/-)
Dr. Pradnya Wakpanjean
Affiliation Section (Addl. Charge)

**सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षापासून नवीन अभ्यासक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी यांना "नवीन महाविद्यालय मान्यता प्रणाली" (NCPS - New College Permission System) द्वारे मंजुरी देण्यासाठी कार्यपद्धती व निकष विहित करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**

**शासन निर्णय क्र. मान्यता-२०२५/ई-१३१९८७८/मशि-४**

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२

**दिनांक : १८ सप्टेंबर, २०२५.**

**संदर्भ** :- १) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६,

२) शासन निर्णय क्र. एनजीसी २०१७/(२०८/१७)/मशि-४, दिनांक १३.०९.२०१७.

**प्रस्तावना :**

राज्यातील उच्च शिक्षणाचा दर्जा व गुणवत्ता वाढविण्यासाठी व इतर अनुषंगिक बाबींसाठी महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ अंमलात आणलेला आहे. सदर अधिनियमातील कलम १०९ (४) नुसार नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी मंजुरीसाठी कालबद्ध तरतूद करण्यात आलेली आहे. तसेच, या तरतुदीस अनुसरुन अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने कार्यपद्धती निश्चित करावी, अशी तरतूद कलम १०९ (९) अन्वये करण्यात आली आहे. सदरहू तरतुदींच्या अनुषंगाने सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी यांच्या मंजुरीसाठी कार्यपद्धती व निकष संदर्भाधिन क्र. २ येथील शासन निर्णय दिनांक १३.०९.२०१७ अन्वये विहित करण्यात आलेले होते. सदर शासन निर्णयातील परिच्छेद क्र. १.७ मध्ये विद्यापीठांनी ऑनलाईन प्रणालीमार्फत अर्ज स्विकारण्याबाबत नमूद केले आहे. त्यानुसार राज्यातील १२ अकृषी विद्यापीठांपैकी काही विद्यापीठांमध्ये नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी मंजुरीसाठी अर्ज स्विकारण्याबाबत ऑनलाईन प्रणाली विकसित करण्यात आलेली आहे. परंतु, सदर विद्यापीठांमार्फत विकसित करण्यात आलेल्या ऑनलाईन प्रणालीमध्ये एकसुत्रता दिसून येत नसल्याने, शासन स्तरावर सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षापासून नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडीबाबतचे प्रस्ताव शासनास सादर करण्यासाठी "नवीन महाविद्यालय मान्यता प्रणाली (NCPS - New College Permission System)" विकसित करण्यात

आली आहे. सदर ऑनलाईन प्रणालीमध्ये संदर्भाधिन क्र.२ येथील शासन निर्णय, दिनांक १३.०९.२०१७ मधील कार्यपद्धती व निकषांव्यतिरिक्त काही बाबी नव्याने समाविष्ट करण्यात आल्या असल्याने, नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी मंजुरीसाठी सुधारित कार्यपद्धती व निकष सुनिश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार उपरोक्त संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णय अधिक्रमित करुन शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे :

**शासन निर्णय:-**

**१.** सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षापासून नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी यांना मंजुरी देण्यासाठी पुढील प्रमाणे कार्यपद्धती राहील.

**कार्यपद्धती :**

१.१ विद्यापीठांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात उच्च शिक्षणाच्या सुविधांचे सर्वत्र समान वाटप होण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम १०७ मधील तरतुदीनुसार एक सम्यक योजना (Perspective Plan) तयार करावी.

१.२ सर्व विद्यापीठांनी पाच वर्षांचा बृहत आरखडा तयार करावा, त्यामध्ये ज्या जिल्ह्यामध्ये महाविद्यालयीन शिक्षणात ढोबळ पटसंख्या प्रमाण (जीईआर) राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी आहे असे जिल्हे, नक्षलग्रस्त, आदिवासी, डोंगराळ /दुर्गम भागासाठी सर्वोच्च प्राथम्य द्यावे व त्या प्राथम्यक्रमानूसार व तद्नंतर सर्वसाधारण याप्रमाणे त्या-त्या शैक्षणिक वर्षासाठी विशिष्ट एवढ्याच नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडीच्या (पारंपारिक व विधी) (AICTE, PCI व NCTE मंजुरी देत असलेले अभ्यासक्रम सोडून) प्रस्तावांची शिफारस करावी.

१.३ सदर सम्यक योजना महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाकडून मान्य करुन घ्यावी.

१.४ सम्यक योजनेस अनुसरुन विद्यापीठांनी नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी सुरु करण्यासाठी वार्षिक योजना तयार करावी.

१.५ वार्षिक योजनेत समावेश असलेल्या ठिकाणांसाठीचे बिंदु निश्चित केल्यानंतर सर्व अकृषी विद्यापीठांनी सम्यक योजनेतील ठिकाणासह वृत्तपत्रात जाहिरात देऊन अर्ज मागवावेत. सम्यक योजनेच्या बाहेरील ठिकाणासाठी अर्ज स्वीकारले जाणार नाहीत, असा स्पष्ट उल्लेख जाहिरातीत करण्यात यावा व तसे अर्ज स्वीकारु नयेत.

१.६ नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकड्या सुरु करण्यास इच्छुक संस्थांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम १०९ (४) (क) मधील तरतुदीनुसार NCPS या ऑनलाईन प्रणालीद्वारे संबंधित विद्यापीठाकडे, ज्या वर्षापासून परवानगी मागितली असेल त्यावर्षाच्या अगोदरच्या वर्षाच्या सप्टेंबर महिन्याच्या शेवटच्या

दिवसापूर्वी अर्ज दाखल करावेत. त्यासोबत परिशिष्ट "अ" मध्ये तसेच प्रणालीमध्ये नमुद केलेली कागदपत्रे सादर करावीत.

१.७ विद्यापीठांनी ऑनलाईन प्रणालीद्वारेच विहित नमुन्यात अर्ज स्वीकारावेत.

१.८ विद्यापीठांकडे प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करण्याकरीता विद्यापीठाचे कुलगुरू आवश्यक तेवढया छाननी समित्या नियुक्त करतील.

१.९ प्राप्त अर्जांची व कागदपत्रांची पडताळणी, सोबत जोडण्यात आलेल्या परिशिष्ट "अ" मध्ये तसेच प्रणालीमध्ये नमुद करण्यात आलेल्या आवश्यक कागदपत्रांच्या सूचीनुसार करुन छाननी समित्या त्यांचा अहवाल योग्य शिफारशींसह कुलगुरुंना सादर करतील.

१.१० संस्थेच्या प्रस्तावात त्रुटी आढळून आल्यास त्या संस्थेस/ अर्जदारास त्रुटी कळविण्यात येतील.

१.११ त्रुटी कळविण्यात आलेल्या संस्थांनी विद्यापीठाकडे त्रुटीची पुर्तता करणे आवश्यक राहील.

१.१२ त्रुटीच्या पूर्ततेच्या संबंधीच्या कागदपत्रांची छाननी समितीकडून तपासणी करण्यात येईल.

१.१३ प्राप्त प्रस्तावांच्या अनुषंगाने स्थळ पाहणी करण्यासाठी कुलगुरु विद्यापीठस्तरावर आवश्यक तेवढ्या तज्ञ समित्या गठीत करतील. सदर तज्ञ समितीमध्ये छाननी समितीच्या सदस्यांचा अंतर्भाव असणार नाही. सदर तज्ञ समितीने प्रत्यक्ष भेटी देऊन नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडीसाठी संबंधित संस्था सोबत जोडण्यात आलेल्या परिशिष्ट "अ" मध्ये तसेच प्रणालीमध्ये विहित करण्यात आलेल्या सूचीनूसार आवश्यक बाबींची पूर्तता करतात किंवा कसे याबाबत काटेकोर परिक्षण करुन त्यांचा अहवाल व्हिडीओ छायाचित्रणासह अध्यक्ष, अधिष्ठाता मंडळामार्फत कुलगुरुंना सादर करतील. सदर पायाभुत सोयीसुविधा पूर्ण न करणाऱ्या संस्थांची शिफारस विद्यापीठाने करू नये.

१.१४ कुलगुरुंकडून संबंधित संस्थांना पात्रता व अपात्रता कळविण्यात येईल.

१.१५ विद्यापीठामार्फत वरील सर्व कार्यवाही NCPS प्रणालीमार्फतच करण्यात येईल

१.१६ अपात्र ठरविण्यात आलेल्या संस्था त्याविरुध्द विद्यापीठाकडे ऑफलाईन पद्धतीने अपिल दाखल करु शकतील. सदर अपिलावर (गरजेनुसार तज्ञ समिती पाठवून अहवाल घेऊन) कुलगुरु ऑफलाईन पध्दतीने निर्णय देतील. सदर निर्णय विद्यापीठामार्फत प्रणालीवर अपलोड करण्यात येईल.

१.१७ सर्व पात्र अर्जदार संस्थांचे प्रस्ताव मंजुरीच्या शिफारशीसह परिशिष्ट "अ" मध्ये आणि प्रणालीमध्ये नमूद कागदपत्रांसह विद्यापीठांकडून शासनाकडे दिनांक १ एप्रिल रोजी किंवा त्यापुर्वी प्रणालीमार्फत सादर करण्यात येतील.

१.१८ विद्यापीठाकडून प्राप्त झालेल्या व शासनस्तरावरील छाननीअंती पात्र ठरलेल्या प्रस्तावावर शासनाकडून १५ जूनपर्यंत अंतिम मान्यता कळविण्यात येईल.

१.१९ येथे स्पष्ट करण्यात येते की, इच्छुक संस्थांनी विद्यापीठाला प्रस्ताव सादर करणे व विद्यापीठांनी सदर प्रस्ताव छाननीअंती शासनास सादर करणे याबाबत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ

अधिनियम, २०१६ मध्ये जो कालमर्यादेचा दिनांक नमूद केला आहे, त्या दिनांकास सार्वजनिक/ स्थानिक सुट्टी असल्यास त्याच्या पुढील कार्यालयीन दिवशीचा दिनांक हा अंतिम दिनांक असेल.

१.२० वरील परि. १.८ मध्ये विहित केलेली छाननी समिती व परि. १.१३ मध्ये विहित केलेली तज्ञ समिती यांची संख्या ती-ती विद्यापीठे त्या-त्या वर्षी सुरु करावयाच्या विद्याशाखा, अभ्यासक्रम, विषय व अतिरिक्त तुकडी वाढ यांची व्याप्ती विचारात घेवून ठरवतील व विहित केलेल्या वेळापत्रकात काम होईल याची खातरजमा करतील.

**२.** सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षापासून नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी यांना मंजूरी देण्यासाठी पुढे विहीत केलेल्या निकषांनुसार कार्यवाही करण्यात यावी.

**निकष :**

२.१. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियमातील कलम १०९(६) मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे विद्यापीठ नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी सुरु करण्यासाठीचे उच्च शिक्षणाच्या विद्यमान महाविद्यालयाचा किंवा परिसंस्थेचा अर्ज, जर, -

(क) ते, अधिस्विकृती अधिकरणांच्या (NAAC) मानांकनानुसार अधिस्विकृती किंवा पुनर्रअधिस्विकृती मिळण्यासाठी पात्र आणि अपेक्षित असले तरीसुद्धा, एकतर राष्ट्रीय मुल्यांकन व अधिस्विकृती परिषदेकडून किंवा राष्ट्रीय अधिस्विकृती मंडळाकडून (NBA) अधिस्विकृती किंवा पुनर्रअधिस्विकृती करण्यात आली नसतील; आणि

(ख) राज्य शासनाने निर्धारित केलेल्या शर्तीचे ते अनुपालन करीत नसतील तर, राज्य शासनाकडे पाठविणार नाही.

त्याचप्रमाणे, ज्यांची यापूर्वीच महाविद्यालये अस्तित्वात आहेत, त्यांचेबाबतीत पुढील पुर्तता नसलेल्या संस्थांचे अर्ज शासनाकडे शिफारशीत करु नयेत.

अ) ज्या संस्थांच्या महाविद्यालयातील प्राचार्यांसहित सर्व अध्यापकांची पदे अर्हताधारक व पात्र उमेदवारामधून भरलेली नसतील तर,

ब) यासोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ, ब, क ची तसेच प्रणालीमध्ये नमूद बाबींची पुर्तता करत नसतील तर.

२.२. शासनाच्या प्रचलित धोरणानुसार नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकड्यांची मान्यता ही कायम विनाअनुदानित तत्वावर राहील.

२.३. नवीन पाठ्यक्रमाची शिफारस करताना अशा अभ्यासक्रमास शिखर संस्था / केंद्रीय नियामक मंडळ यांची मान्यता आवश्यक असल्यास त्यांच्या मान्यतेशिवाय असा पाठ्यक्रम शासनास शिफारशीत करण्यात येऊ नये.

२.४ ज्या महाविद्यालयाकरीता नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी प्रस्तावित करण्यात आलेली आहे, त्या महाविद्यालयामध्ये अस्तित्वात असलेल्या अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, तुकड्यांना शासन मान्यता आहे, शासनाने विहित केलेल्या निकषांनुसार मुलभूत व भौतिक सुविधा उपलब्ध आहेत, याची खातरजमा केल्यानंतरच प्रस्ताव शिफारशीत केले जावेत.

२.५ ज्या महाविद्यालयाकरीता नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी प्रस्तावित करण्यात आलेली आहे, त्या वाढीव अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडीकरीता शासनाने विहित केलेल्या निकषांनुसार वाढीव भौतिक व मुलभूत सुविधा उपलब्ध असल्याची प्रमाणित कागदपत्रे महाविद्यालयांनी अर्जासोबत जोडणे आवश्यक असून विद्यापीठाने ही बाब प्रमाणित करावी.

२.६ ज्या महाविद्यालयाकरीता नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी प्रस्तावित करण्यात आलेली आहे, त्याकरीता विहित निकषांप्रमाणे नियमित शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी नियुक्त केले असल्याचे प्रमाणपत्र विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी पुढील ०६ महिन्यांमध्ये शासनास सादर करावे.

**३.** विद्यापीठांनी शासनाकडे प्रस्ताव पाठविताना त्यात नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी असे वर्गीकरण केलेले असावे.

**४.** विद्यापीठांनी शासनाकडे प्रस्ताव पाठविताना प्रस्ताव विहित केलेल्या निकषांची पुर्तता करीत असल्याची खात्री करावी. यापुर्वी विद्यापीठांनी प्रस्ताव पाठविताना विहित निकषांची पुर्तता नसतानासुद्धा प्रस्ताव शासनस्तरावर शिफारशीत केलेले आहेत. त्यामुळे अशा शिफारस केलेल्या प्रकरणी शासनास नाहक न्यायालयीन प्रकरणास सामोरे जावे लागले आहे. तेव्हा, विहित निकषांची पुर्तता करीत नसताना प्रस्ताव शासनास सादर झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी प्र.कुलगुरु तथा अध्यक्ष, अधिष्ठाता मंडळ यांची राहील.

**५.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५०९१८१४४७२७२७०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने स्वाक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

ASHOK SHANKAR MANDE

Digitally signed by ASHOK SHANKAR MANDE
DN: CN = ASHOK SHANKAR MANDE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT
Date: 2025.09.19 12:47:56 +05'30'

**(अशोक मांडे)**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा. उपमुख्यमंत्री (नगरविकास) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा. उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई,
६. मा. राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
७. सर्व मा.मंत्री/राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
८. मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद/विधानसभा, विधानभवन, मुंबई,
९. सर्व मा.संसद सदस्य/मा.विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य,
१०. अपर मुख्य सचिव (उच्च व तंत्र शिक्षण विभाग), मंत्रालय, मुंबई,
११. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
१२. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य,
१३. सर्व सहसचिव/उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई,
१४. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.
१५. कार्यासन अधिकारी (विशि-५), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई,
१६. निवड नस्ती (मशि-४).

**शासन निर्णय क्र. मान्यता-२०२५/ ई-१३१९८७८ /मशि-४, दिनांक १८ सप्टेंबर, २०२५ सोबतचे**

## "परिशिष्ट - अ"

| अ.क्र. | तपासणी सूची |
|---|---|
| १. | संस्थेचा तपशील |
| २. | विस्तारीकरणांतर्गत अर्ज करण्यासाठी अर्जदारास प्राधिकृत केल्याबाबतचे प्रमाणपत्र व प्राधिकृत केलेल्या अर्जदाराचा तपशील. |
| ३. | संस्था नोंदणी प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत. |
| ४. | नवीन अभ्यास पाठयक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी ज्या महाविद्यालयात सुरु करावयाचे आहे, त्या महाविद्यालयाचा अंतिम मान्यतेबाबतचा शासन निर्णय. |
| ५. | संस्थेच्या चालू वर्षाच्या तपशिलवार अंदाजपत्रकाची साक्षांकित प्रत. |
| ६. | संस्थेच्या मागील वर्षाच्या लेखापरीक्षण अहवालाची सनदी लेखापाल (Chartered Accountant) यांनी प्रमाणित केलेली प्रत |
| ७. | संबंधित संस्थेचे आर्थिक व्यवहार राष्ट्रीयकृत / शेड्युल बँकेमार्फत केले जात असल्याचे कागदपत्र. (संस्थेचे नाव ,बँकेचे नाव व बँकेचा IFSC CODE दर्शवणारे कागदपत्र, उदा. बँक बॅलन्स स्टेटमेंट, पासबुक चे प्रथम पृष्ठ व अंतिम पृष्ठ) |
| ८. | प्रस्ताव ज्या शैक्षणिक वर्षासाठी दाखल केला आहे, त्या शैक्षणिक वर्षापासून पुढील किमान ५ वर्ष मुदतीच्या मुदत ठेव पावतीची (Fix Deposit) प्रमाणित प्रत<br>नवीन अभ्यास पाठ्यक्रम - रु. ५.०० लाख<br>विषय - रु. २.०० लाख<br>विद्याशाखा - रु. ५.०० लाख<br>अतिरिक्त तुकडी - रु. ३.०० लाख |
| ९. | संबंधित राष्ट्रीयकृत/शेड्युल बँकेत ठेवलेला ठेव निधी विद्यापीठाच्या पुर्व परवानगीशिवाय न काढणेबाबतचे संबंधित राष्ट्रीयकृत बँकेचे व संस्थेचे संयुक्त आश्वासन पत्र.<br>(बँकेच्या लेटर हेड वर ) |
| १०. | शासनाचे कायम विनाअनुदानित धोरण लक्षात घेता, अर्जासोबत महाविद्यालयाचा नियमानुसार वेतन व वेतनेतर खर्च संस्था करणार असल्याबाबतचे रु. ५००/- च्या स्टँपपेपरवर नोंदणीकृत हमीपत्र. |
| ११. | संस्थेचे सद्यस्थितीत कनिष्ठ महाविद्यालय/शाळा अस्तित्वात असेल तर, कनिष्ठ महाविद्यालय/शाळेच्या अस्तित्वात असलेल्या इमारतीचा वापर वरिष्ठ महाविद्यालयातील प्रस्तावित नवीन अभ्यास पाठयक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी या करीता केला जाणार नाही, असे हमीपत्र |

| | |
|---|---|
| १२. | **नवीन अभ्यास पाठयक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी ज्या महाविद्यालयात सुरु करावयाचे आहे, त्या महाविद्यालयाची जागा उपलब्ध असल्यासंदर्भातील कागदपत्रे :**<br>**१)** नवीन अभ्यास पाठयक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी ज्या महाविद्यालयात सुरु करावयाचे आहे, त्या महाविद्यालकरिता दर्शविलेली जागा कोणत्या क्षेत्रात आहे, त्याबाबत सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र (महानगरपालिका- क्षेत्रासाठी सहाय्यक आयुक्त/वॉर्ड ऑफिसर; नगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायत या क्षेत्रासाठी मुख्याधिकारी;ग्रामपंचायत क्षेत्रासाठी ग्रामसेवक)<br><br>**२.१)** **<u>स्वत:ची जागा</u>** –<br><br>**अ)** "अ", "ब" आणि "क" वर्ग महानगरपालिका क्षेत्रामध्ये १/२ एकर अकृषक जागा संस्थेच्या नावावर असलेल्या सरकारी कागदपत्रांची प्रमाणित प्रत. (उदा. गाव नमूना नं ७/१२, मालमत्ता पत्रक)<br>**ब)** "अ", "ब" आणि "क" वर्ग महानगरपालिका क्षेत्रापासून ५ कि.मी. परिसरात किमान १ एकर अकृषक जागा संस्थेच्या नावावर असलेल्या कागदपत्रांची प्रमाणित प्रत. (उदा. गाव नमूना नं ७/१२, मालमत्ता पत्रक)<br>**क)** "ड" वर्ग महापालिका व नगरपालिका क्षेत्रात किमान १ एकर अकृषक जागा संस्थेच्या नावावर असलेल्या सरकारी कागदपत्रांची प्रमाणित प्रत. (उदा. गाव नमूना नं ७/१२, मालमत्ता पत्रक)<br>**ड)** "ड" वर्ग महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रापासून ५ कि.मी. परिसरात किमान २ एकर अकृषक जागा. (उदा. गाव नमूना नं ७/१२, मालमत्ता पत्रक)<br>**इ)** उर्वरित सर्व क्षेत्रांसाठी किमान ३ एकर अकृषक जागा संस्थेच्या नावावर असलेल्या सरकारी कागदपत्रांची प्रमाणित प्रत. (उदा. गाव नमूना नं ७/१२, मालमत्ता पत्रक)<br><br>**२.२)** **<u>भाड्याची जागा</u> - (किमान ०५ वर्षासाठी भाडेकरारनामा)**<br>**अ)** "अ", "ब" आणि "क" वर्ग महानगरपालिका क्षेत्रामध्ये १/२ एकर अकृषक जागा संस्थेच्या नावे भाडेतत्वावर घेतलेल्या नोंदणीकृत कराराची प्रत.<br>**ब)** "अ", "ब" आणि "क" वर्ग महानगरपालिका क्षेत्रापासून ५ कि.मी. परिसरात किमान १ एकर अकृषक जागा संस्थेच्या नावे भाडेतत्वावर घेतलेल्या नोंदणीकृत कराराची प्रत.<br>**क)** "ड" वर्ग महापालिका व नगरपालिका क्षेत्रात किमान १ एकर अकृषक जागा संस्थेच्या नावे भाडेतत्वावर घेतलेल्या नोंदणीकृत कराराची प्रत.<br>**ड)** "ड" वर्ग महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रापासून ५ कि.मी. परिसरात किमान २ एकर अकृषक जागा.<br>**इ)** उर्वरित सर्व क्षेत्रांसाठी किमान ३ एकर अकृषक जागा संस्थेच्या नावे भाडेतत्वावर घेतलेल्या नोंदणीकृत कराराची प्रत. |

| | |
|---|---|
| | उपरोक्त "अ","ब","क","ड",“इ” मधील नोंदणीकृत कराराच्या अनुषंगाने भाडेकरारातील जमीन ही जमीन मालकाच्या नावावर असल्याचे प्रमाणित कागदपत्र उदा. गाव नमुना नं ७/१२ अथवा मालमत्ता पत्रक.<br><br>**३.** प्रस्तुत महाविद्यालयाची जमीन (संस्थेची स्वतःची किंवा भाडेतत्त्वावरील) अकृषक असल्यासंदर्भातील महसूल विभागाचे आदेश / गावठाण जमिनीसंदर्भात महसूल व वनविभागाच्या दिनांक १३.०४.२०२२ रोजीच्या परिपत्रकानुसार अकृषक सनद. |
| १३. | **महाविद्यालयाच्या इमारतीचा तपशील-**<br>**१.** नवीन अभ्यास पाठयक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी ज्या महाविद्यालयात सुरु करावयाचे आहे, त्या महाविद्यालयाची इमारत (संस्थेची/भाडेतत्त्वावरील) संबंधित स्थानिक स्वराज संस्था किंवा अन्य संबंधित प्राधिकरणाचे इमारत बांधकाम पुर्णत्वाबाबतचे प्रमाणपत्र, ज्यामध्ये इमारतीचे क्षेत्रफळ चौ.फु./चौ.मी., गट/सर्वे नंबर आणि ज्याभागातील इमारत आहे त्याबाबतचा तपशील नमूद असणे अनिवार्य आहे.<br><br>**२.** इमारत भाडेतत्वावरील असल्यास अर्ज करावयाच्या वर्षापासून पुढील किमान ५ वर्ष कालावधीचा नोंदणीकृत भाडेकरारनामा<br><br>**३.** शैक्षणिक व प्रशासकीय इमारती मधील कक्षांचा तपशील (सोबतच्या परिशिष्ट-“ड” मध्ये सर्वसाधारण वर्ग खोली व इतर क्षेत्रफळाचा तपशील सोबत जोडला आहे.)<br><br>३.१) प्राचार्य कक्ष<br>३.२) कार्यालय<br>३.३) इलेक्ट्रॉनिक्स / संगणक प्रयोगशाळा<br>३.४) रसायनशास्त्र प्रयोगशाळा<br>३.५) पदार्थ विज्ञान प्रयोगशाळा<br>३.६) जीवशास्त्र प्रयोगशाळा<br>३.७) ग्रंथालय<br>३.८)महिला कक्ष<br>३.९) अभिलेख कक्ष<br>३.१०) नॅक कक्ष<br>३.११) कर्मचारी कक्ष<br>३.१२) सभागृह<br>३.१३) मोठे व्याख्यान कक्ष<br>३.१४) स्वछतागृह (२० विद्यार्थ्यामागे १ स्वछतागृह महिलांसाठी स्वतंत्र स्वछतागृह व प्रसाधने )<br>३.१५) व्हरांडा<br>३.१६)राष्ट्रीय छात्र सेना कक्ष<br>३.१७) राष्ट्रीय सेवा योजना कक्ष |

| | |
|---|---|
| | **४.** पाणी सुविधा (प्रस्ताव ज्या वर्षी दाखल केला जाईल त्या पूर्वीच्या वर्षातील स्थानिक प्राधिकरणाची पाणी पट्टी पावती)<br>**५.** वीज सुविधा (प्रस्ताव ज्या महिन्यात दाखल केला जाईल त्या पूर्वीच्या महिन्यातील वीज देयकाची प्रत)<br>**६.** ड्रेनेज सुविधा (ड्रेनेज सुविधा असल्याबाबत स्थानिक प्राधिकरणाचे नकाशासह प्रमाणपत्र)<br>**७.** वसतिगृह सुविधा (महाविद्यालयाच्या परिसरात २०% विद्यार्थ्यांची राहण्याची सोय असल्याचे संस्थेचे हमीपत्र) |
| १४. | अनुक्रमांक १३ येथे विहित केलेल्या कक्ष / रूम करीता फर्निचरसाठी किमान रु. ५.०० लक्ष शिल्लक असल्याबाबतचा पुरावा. |
| १५. | जो पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, तुकडी सुरु करावयाचा आहे. त्यासंदर्भातील पुस्तकांची ग्रंथालयात सुविधा (किमान १०० पुस्तके प्रत्यक्षात हवीत) |
| १६. | महाविद्यालय भाडेतत्त्वावरील इमारतीत सुरु केले जाणार असेल तर प्रथम संलग्नीकरण मिळाल्यापासून ५ वर्षांमध्ये महाविद्यालय ज्या स्थळबिंदूसाठी मंजूर झाले आहे त्याठिकाणी स्वतःच्या इमारतीमध्ये स्थलांतरित करणार असल्याबाबतचे हमीपत्र |
| १७. | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियमातील कलम १०९(६) मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे ज्या संस्थेचे यापुर्वीचे महाविद्यालय अस्तित्वात आहे, अशा संस्थेने नविन महाविद्यालयाची मागणी केल्यास पुर्वीच्या महाविद्यालयाचे नॅक/एनबीए मुल्यांकन अथवा पुनर्मुल्यांकन असणे आवश्यक आहे. |

ASHOK SHANKAR MANDE

Digitally signed by ASHOK SHANKAR MANDE
DN: CN = ASHOK SHANKAR MANDE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT
Date: 2025.09.19 12:48:08 +05'30'

**(अशोक मांडे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**शासन निर्णय क्र. मान्यता-२०२५/ई-१३१९८७८/मशि-४, दिनांक १८ सप्टेंबर, २०२५ सोबतचे**

## "परिशिष्ट- ब"

**<u>पदवी स्तरावर बायोटेक्नॉलॉजी विषय सुरू करण्यासाठी आवश्यक निकष.</u>**

| अ.क्र. | तपासणी सूची |
|---|---|
| १. | हा विषय सुरू करताना त्या महाविद्यालयात विज्ञान शाखा असणे आवश्यक आहे. |
| २. | सदर महाविद्यालयात विज्ञान शाखा ४ वर्षापूर्वी सुरू झालेली पाहिजे म्हणजेच विज्ञान शाखेची एक बॅच पास असणे आवश्यक आहे. |
| ३. | महाविद्यालयाचे नॅक मुल्यांकन "अ" श्रेणीचे असणे आवश्यक आहे. |
| ४. | सदर महाविद्यालयातून बायोलॉजीची एक बॅच बाहेर पडली पाहिजे. |
| ५. | या महाविद्यालयात बायोलॉजी, मायक्रोबायोलॉजी, केमेस्ट्री हे विषय पदवी स्तरावर असणे आवश्यक आहे. त्या विषयातील पदवीधारकांची किमान एक बॅच पूर्ण झाली पाहिजे. |
| ६. | भौतिक व मूलभूत सुविधा असणे आवश्यक आहे. |
| ७. | पूर्णवेळ पात्रताधारक शिक्षक असले पाहिजेत. |
| ८. | विद्यापीठ शैक्षणिक अर्हतेप्रमाणे दोन अधिव्याख्याते एम.एस्सी. बायोटेक्नॉलॉजी विषयातील व एक एम.एस्सी. मायक्रोबायोलॉजी विषयाचा अधिव्याख्याता पूर्णवेळ पाहिजे. चौथा शिक्षक एम.एस्सी. केमेस्ट्री, सांख्यीकी पाहिजे. प्रस्तुत अधिव्याख्याता पूर्णवेळ नसला तरी चालेल. |
| ९. | सदर महाविद्यालयात दोन प्रयोगशाळा पाहिजेत. |
| १०. | विषय सुरू ठेवण्यासाठी महाविद्यालयाची आर्थिक परिस्थिती चांगली असली पाहिजे. |

ASHOK SHANKAR MANDE

Digitally signed by ASHOK SHANKAR MANDE
DN: CN = ASHOK SHANKAR MANDE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT
Date: 2025.09.19 12:48:16 +05'30'

**(अशोक मांडे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**शासन निर्णय क्र. मान्यता-२०२५/ई-१३१९८७८/मशि-४, दिनांक १८ सप्टेंबर, २०२५ सोबतचे**

## "परिशिष्ट- क"

**पदव्युत्तर स्तरावर बायोटेक्नॉलॉजी विषय सुरू करण्यासाठी आवश्यक निकष.**

| अ.क. | तपासणी सूची |
|---|---|
| १. | मागणी केलेल्या महाविद्यालयात बी.एस्सी. बायोटेक्नॉलॉजी हा विषय असला पाहिजे. |
| २. | सदर महाविद्यालयाचे नॅक मूल्यांकन किमान "अ" श्रेणी असले पाहिजे. |
| ३. | विज्ञान शाखेचे सर्व विषय असणे आवश्यक आहे. |
| ४. | बी.एस्सी. बायोटेक्नॉलॉजीचा विभाग तीन वर्षापेक्षा जास्त कालावधीचा असला पाहिजे. |
| ५. | तीन पूर्णवेळ व एक अर्धवेळ शिक्षक असणे आवश्यक आहे. |
| ६. | दोन प्रयोगशाळा सहाय्यक असणे आवश्यक आहे. |
| ७. | किमान ६०० वर्ग फूट जागेच्या दोन प्रयोगशाळा असाव्यात. |
| ८. | भौतिक व मूलभूत सुविधा असणे आवश्यक आहे. |

ASHOK SHANKAR MANDE

Digitally signed by ASHOK SHANKAR MANDE
DN: CN = ASHOK SHANKAR MANDE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT
Date: 2025.09.19 12:48:24 +05'30'

**(अशोक मांडे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**शासन निर्णय क्र.  मान्यता-२०२५/ई-१३१९८७८ /मशि-४, दिनांक १८ सप्टेंबर, २०२५ सोबतचे.**

## “परिशिष्ट- ड”

### परिशिष्ट अ मधील अ.क्र. १३ साठी कक्षनिहाय किमान आवश्यक क्षेत्रफळ

| अ.क्र. | कक्षाचे नाव | नग | क्षेत्र प्रति नग | एकुण क्षेत्र | कला/विधी/ शिक्षण शाखा | वाणिज्य | विज्ञान | कला + वाणिज्य | कला + विज्ञान | वाणिज्य + विज्ञान | कला, वाणिज्य, विज्ञान |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | प्राचार्य कक्ष | १ | २०×२५ | ५०० | ५०० | ५०० | ५०० | ५०० | ५०० | ५०० | ५०० |
| २) | कार्यालय | १ | ३०×२० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० |
| ३) | इलेक्ट्रॉनिक/संगणक प्रयोगशाळा | १ | २०×३० | ६०० | -- | -- | ६००(०) | -- | ६००(०) | ६००(०) | ६००(०) |
| ४) | रसायनशास्त्र प्रयोगशाळा | १ | ३०×४० | १२०० | -- | -- | १२०० | -- | १२०० | १२०० | १२०० |
| ५) | पदार्थ विज्ञान प्रयोगशाळा | १ | ३०×४० | १२०० | -- | -- | १२०० | -- | १२०० | १२०० | १२०० |
| ६) | जिवशास्त्र प्रयोगशाळा | १ | ३०×४० | १२०० | -- | -- | १२०० | -- | १२०० | १२०० | १२०० |
| ७) | ग्रंथालय | १ | २०×३० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० |
| ८) | एनसीसी रुम | १ | २०×१५ | ३०० | ३००(०) | ३००(०) | ३००(०) | ३००(०) | ३००(०) | ३००(०) | ३००(०) |
| ९) | एन.एस.एस.रुम | १ | २०×१५ | ३०० | ३००(०) | ३००(०) | ३००(०) | ३००(०) | ३००(०) | ३००(०) | ३००(०) |
| १०) | लेडीज रुम | १ | १०×१५ | १५० | १५० | १५० | १५० | १५० | १५० | १५० | १५० |
| ११) | रेकॉर्ड रुम | १ | १०×१५ | १५० | १५० | १५० | १५० | १५० | १५० | १५० | १५० |
| १२) | नॅक रूम | १ | १०×१५ | १५० | १५०(०) | १५०(०) | १५०(०) | १५०(०) | १५०(०) | १५०(०) | १५०(०) |
| १३) | स्टाफ रूम | १ | २०×३० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० |
| १४) | सभागृह | १ | ४०×३० | १२०० | १२०० | १२०० | १२०० | १२०० | १२०० | १२०० | १२०० |
| १५) | मोठे व्याख्यान कक्ष | ३/६/९ | | ९०० | २७०० | २७०० | २७०० | ५४०० | ५४०० | ५४०० | ८१०० |
| १६) | टॉयलेट ब्लॉक | ४ | १०×१५ | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० |
| १७) | व्हरांडा | १ | किमान ५ फुट रुंद | | २१०० | २४०० | ३३०० | ३००० | ३८०० | ४१०० | ४६५० |
| | **एकूण (किमान आवश्यक क्षेत्रफळ)** | | | **१०२५०** | **९२००** | **९५००** | **१४०००** | **१२८००** | **१७२००** | **१७५००** | **२०७५०** |

*** महाविद्यालयासाठी स्वतंत्र शिखर संस्था / केंद्रीय नियामक मंडळे असल्यास अशा शिखर संस्था/ केंद्रिय नियामक मंडळाच्या नियमानुसार त्यांनी विहित केलेल्या आवश्यक भौतिक सुविधा व शैक्षणिक सुविधांचे निकष त्यांना लागू राहतील.**

ASHOK SHANKAR MANDE

Digitally signed by ASHOK SHANKAR MANDE
DN: CN = ASHOK SHANKAR MANDE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT
Date: 2025.09.19 12:48:33 +05'30'

**(अशोक मांडे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**Faculty :** **Humanities**

| S.No. | Name of Course in English | Name of Course in Marathi/Hindi | Extension New Faculty | Extension New Course | Extension New Subject | Extension Additional Division |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | BACHELOR OF ARTS (ECONOMICS) | बॅचलर ऑफ आट्र्स (अर्थशास्त्र) | 0 | 0 | 0 | 0 |
| 2 | BACHELOR OF ARTS (ENGLISH) | बॅचलर ऑफ आट्र्स (इंग्रजी) | 0 | 0 | 0 | 0 |
| 3 | BACHELOR OF ARTS (GEOGRAPHY) | बॅचलर ऑफ आट्र्स (भूगोल) | 0 | 0 | 0 | 0 |
| 4 | BACHELOR OF ARTS (GUJARATI) | बॅचलर ऑफ आट्र्स (गुजराती) | 0 | 0 | 0 | 0 |
| 5 | BACHELOR OF ARTS (HINDI) | बॅचलर ऑफ आट्र्स (हिंदी) | 0 | 0 | 0 | 0 |
| 6 | BACHELOR OF ARTS (HISTORY) | बॅचलर ऑफ आट्र्स (इतिहास) | 0 | 0 | 0 | 0 |
| 7 | BACHELOR OF ARTS (MARATHI) | बॅचलर ऑफ आट्र्स (मराठी) | 0 | 0 | 0 | 0 |
| 8 | BACHELOR OF ARTS (POLITICAL SCIENCE) | बॅचलर ऑफ आट्र्स (पॉलिटीकल सायन्स) | 0 | 0 | 0 | 0 |
| 9 | BACHELOR OF ARTS (PSYCHOLOGY) | बॅचलर ऑफ आट्र्स (सायकोलॉजी) | 0 | 0 | 0 | 0 |
| 10 | BACHELOR OF ARTS (SANSKRIT) | बॅचलर ऑफ आट्र्स (संस्कृत) | 0 | 0 | 0 | 0 |
| 11 | BACHELOR OF ARTS (SOCIOLOGY) | बॅचलर ऑफ आट्र्स (समाजशास्त्र) | 0 | 0 | 0 | 0 |
| 12 | MASTER OF ARTS (ECONOMICS) | मास्टर ऑफ आट्र्स (अर्थशास्त्र) | 35000 | 35000 | 15000 | 15000 |
| 13 | MASTER OF ARTS (ENGLISH) | मास्टर ऑफ आर्टस (इंग्लिश) | 35000 | 35000 | 15000 | 15000 |
| 14 | MASTER OF ARTS (GEOGRAPHY) | मास्टर ऑफ आट्र्स (भुगोल) | 35000 | 35000 | 15000 | 15000 |
| 15 | MASTER OF ARTS (GUJARATI) | मास्टर ऑफ आट्र्स (गुजराती) | 35000 | 35000 | 15000 | 15000 |
| 16 | MASTER OF ARTS (HINDI) | मास्टर ऑफ आट्र्स (हिंदी) | 35000 | 35000 | 15000 | 15000 |
| 17 | MASTER OF ARTS (HISTORY) | मास्टर ऑफ आट्र्स (इतिहास) | 35000 | 35000 | 15000 | 15000 |
| 18 | MASTER OF ARTS (MARATHI) | मास्टर ऑफ आट्र्स (मराठी) | 35000 | 35000 | 15000 | 15000 |
| 19 | MASTER OF ARTS (POLITICAL SCIENCE) | मास्टर ऑफ आट्र्स (पॉलिटीकल सायन्स) | 35000 | 35000 | 15000 | 15000 |
| 20 | MASTER OF ARTS (PSYCHOLOGY - CLINICAL PSYCHOLOGY) | मास्टर ऑफ आट्र्स (सायकोलॉजी - क्लिनिकल सायकोलॉजी) | 35000 | 35000 | 15000 | 15000 |
| 21 | MASTER OF ARTS (PSYCHOLOGY - COUNSELLING PSYCHOLOGY) | मास्टर ऑफ आट्र्स (सायकोलॉजी - कॉउन्सिलिंग सायकोलॉजी) | 35000 | 35000 | 15000 | 15000 |
| 22 | MASTER OF ARTS (PSYCHOLOGY - INDUSTRIAL PSYCHOLOGY) | मास्टर ऑफ आट्र्स (सायकोलॉजी - इंडस्ट्रीयल सायकोलॉजी) | 35000 | 35000 | 15000 | 15000 |
| 23 | MASTER OF ARTS | मास्टर ऑफ आट्र्स | 35000 | 35000 | 15000 | 15000 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | (SANSKRIT) | (संस्कृत) | | | | |
| 24 | MASTER OF ARTS (SOCIOLOGY) | मास्टर ऑफ आर्ट्स (समाजशास्त्र) | 35000 | 35000 | 15000 | 15000 |

**Faculty :** **Inter-Disciplinary Studies**

| S.No. | Name of Course in English | Name of Course in Marathi/Hindi | Extension New Faculty | Extension New Course | Extension New Subject | Extension Additional Division |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | BACHELOR OF ARTS (MASS MEDIA - ADVERTISING) | बॅचलर ऑफ आर्ट्स मास मिडिया - ऍडव्हरटायझिंग | 50000 | 50000 | 15000 | 15000 |
| 2 | BACHELOR OF ARTS (MASS MEDIA - ANIMATION) | बॅचलर ऑफ आर्ट्स मास मिडीया - एनिमेशन | 50000 | 50000 | 15000 | 15000 |
| 3 | BACHELOR OF ARTS (MASS MEDIA - JOURNALISM) | बॅचलर ऑफ आर्ट्स मास मिडीया - जर्नलिजम | 50000 | 50000 | 15000 | 15000 |
| 4 | BACHELOR OF ARTS (MUSIC) | बॅचलर ऑफ आर्ट्स (म्युजिक) | 35000 | 35000 | 15000 | 15000 |
| 5 | MASTER OF ARTS (EDUCATION MANAGEMENT) | मास्टर ऑफ आर्ट्स (एज्युकेशन मॅनेजमेंट) | 0 | 0 | 0 | 0 |
| 6 | MASTER OF ARTS (ELEARNING) | मास्टर ऑफ आर्ट्स इलर्निंग | 0 | 0 | 0 | 0 |
| 7 | MASTER OF ARTS (MASS COMMUNICATION AND JOURNALISM) | मास्टर ऑफ आर्ट्स (मास कम्युनिकेशन अँड जर्नलिझम) | 25000 | 0 | 0 | 15000 |
| 8 | MASTER OF ARTS (MEDIA AND COMMUNICATIONS) | मास्टर ऑफ आर्ट्स (मिडीया अँड कम्युनिकेशन) | 35000 | 35000 | 15000 | 15000 |
| 9 | MASTER OF ARTS (MUSIC) | मास्टर ऑफ आर्ट्स (म्युजिक) | 35000 | 35000 | 15000 | 15000 |
| 10 | MASTER OF ARTS (WOMEN'S STUDIES) | मास्टर ऑफ आर्ट्स (वुमन स्टडिज्) | 0 | 0 | 0 | 0 |
| 11 | MASTER OF DESIGN (NON-AICTE) | मास्टर ऑफ डिझाईन (नॉन ए.आय. सी. टी.ई) | 50000 | 50000 | 15000 | 15000 |
| 12 | MASTER OF LAW (BUSINESS LAW) | मास्टर ऑफ लॉ (बिजनेस लॉ) | 30000 | 30000 | 30000 | 30000 |
| 13 | MASTER OF LAW (HUMAN RIGHTS LAW) | मास्टर ऑफ लॉ (ह्युमन राइट्स लॉ) | 30000 | 30000 | 30000 | 30000 |
| 14 | MASTER OF LAW (INTELLECTUAL PROPERTY LAW) | मास्टर ऑफ लॉ (इंटेलेकच्युअल प्रॉपर्टी लॉ) | 30000 | 30000 | 30000 | 30000 |
| 15 | MASTER OF LIBRARY AND INFORMATION SCIENCE | मास्टर ऑफ लायब्ररी व इनफॉर्मेशन सायंस | 0 | 0 | 0 | 0 |
| 16 | MASTER OF MASS MEDIA | मास्टर ऑफ मास मिडीया | 35000 | 35000 | 20000 | 20000 |
| 17 | MASTER OF SCIENCE (COMMUNICATION MEDIA FOR CHILDREN) | मास्टर ऑफ सायन्स (कम्युनिकेशन मिडीया फॉर चिल्ड्रेन) | 35000 | 35000 | 15000 | 15000 |
| 18 | MASTER OF SCIENCE | मास्टर ऑफ सायन्स | 0 | 0 | 0 | 0 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | (NUTRITION AND HEALTH COMMUNICATION) | (न्युट्रीशन अँड हेल्थ कम्युनिकेशन) | | | | |
| 19 | MASTER OF VISUAL ARTS (CREATIVE PAINTING) | मास्टर ऑफ विजुअल आर्ट् (क्रिएटिव पेंटीग) | 0 | 0 | 0 | 0 |
| 20 | MASTER OF VISUAL ARTS (MURAL) | बॅचलर ऑफ विजुअल आर्ट् (म्युरल) | 0 | 0 | 0 | 0 |
| 21 | POST GRADUATE DIPLOMA IN EDUCATION MANAGEMENT | पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन एज्युकेशन मॅनेजमेंट | 0 | 0 | 0 | 0 |
| 22 | POST GRADUATE DIPLOMA IN ELEARNING | पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन इलर्निंग | 0 | 0 | 0 | 0 |
| 23 | POST GRADUATE DIPLOMA IN FASHION AND DESIGN | पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन फॅशन अँड डिझाईन | 0 | 0 | 0 | 0 |
| 24 | POST GRADUATE DIPLOMA IN MANAGEMENT OF LEARNING DISABILITIES | पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन मॅनेजमेंट ऑफ़ लर्निंग डिसबिलि टी | 0 | 0 | 0 | 0 |
| 25 | POST GRADUATE DIPLOMA IN PRE-SCHOOL TEACHER EDUCATION | पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन प्री-स्कुल टिचर एज्युकेशन | 0 | 0 | 0 | 0 |
| 26 | POST GRADUATE DIPLOMA IN SCHOOL COUNSELLING | पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन स्कुल कॉउन्सेलिंग | 0 | 0 | 0 | 0 |
| 27 | POST GRADUATE DIPLOMA IN TRAVEL AND TOURISM | पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन ट्रॅव्हल अँड टुरीजम | 0 | 0 | 0 | 0 |

**Faculty : Science and Technology**

| S.No. | Name of Course in English | Name of Course in Marathi/Hindi | Extension New Faculty | Extension New Course | Extension New Subject | Extension Additional Division |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | BACHELOR OF SCIENCE (B.SC.) | बॅचलर ऑफ सायंस (बी. एस्सी.) | 35000 | 35000 | 15000 | 15000 |
| 2 | BACHELOR OF SCIENCE (BOTANY) | बॅचलर ऑफ सायंस (बॉटनी) | 0 | 0 | 0 | 0 |
| 3 | BACHELOR OF SCIENCE (CLINICAL LABORATORY SCIENCE) (CLS) | बॅचलर ऑफ सायंस (क्लिनिकल लेबॉरेटरी सायंस) (बी.एस्सी.सी.एल.एस) | 50000 | 50000 | 15000 | 15000 |
| 4 | BACHELOR OF SCIENCE (HOME SCIENCE - FOOD SCIENCE AND QUALITY CONTROL) | बॅचलर ऑफ सायंस (होम सायन्स – फुड सायंस अँड क्वालीटी कन्ट्रोल) | 15000 | 15000 | 15000 | 15000 |
| 5 | BACHELOR OF SCIENCE (HOME SCIENCE - FOOD, NUTRITION AND DIETETICS) | बॅचलर ऑफ सायंस (होम सायन्स - फुड, न्युट्रीशन अँड डाइटटिक्स ) | 15000 | 15000 | 15000 | 15000 |
| 6 | BACHELOR OF SCIENCE (HOME SCIENCE - HUMAN DEVELOPMENT) | बॅचलर ऑफ सायंस (होम सायन्स - ह्युमन डेव्हलपमेंट) | 15000 | 15000 | 15000 | 15000 |
| 7 | BACHELOR OF SCIENCE (HOME SCIENCE - HUMAN ECOLOGY AND CONSUMER SERVICES) | बॅचलर ऑफ सायंस (होम सायन्स – ह्युमन इकॉलॉजी कंसुमर सर्व्हीसेस) | 15000 | 15000 | 15000 | 15000 |
| 8 | BACHELOR OF SCIENCE (HOME SCIENCE - INTERIOR DESIGN AND RESOURCE MANAGEMENT) | बॅचलर ऑफ सायंस (होम सायन्स - इंटेरियर डिझाईन अँड रीसोर्स मॅनेजमेंट) | 15000 | 15000 | 15000 | 15000 |
| 9 | BACHELOR OF SCIENCE (HOME SCIENCE - TEXTILE AND APPAREL DESIGNING) | बॅचलर ऑफ सायंस (होम सायन्स - टेक्सटाईल अँड अपैरल डिझाईन) | 0 | 0 | 0 | 0 |
| 10 | BACHELOR OF SCIENCE (INFORMATION TECHNOLOGY) (B.SC. IT) | बॅचलर ऑफ सायंस (ईन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी) | 100000 | 100000 | 30000 | 30000 |
| 11 | BACHELOR OF SCIENCE (MATHEMATICS) | बॅचलर ऑफ सायंस (मॅथेमॅटिक्स) | 0 | 0 | 0 | 0 |
| 12 | BACHELOR OF SCIENCE (MICROBIOLOGY) | बॅचलर ऑफ सायंस (मायक्रोबॉयलॉजी) | 0 | 0 | 0 | 0 |
| 13 | BACHELOR OF SCIENCE (PHYSICS) | बॅचलर ऑफ सायंस (फिजिक्स) | 0 | 0 | 0 | 0 |
| 14 | BACHELOR OF SCIENCE (ZOOLOGY) | बॅचलर ऑफ सायंस (झुलॉजी) | 0 | 0 | 0 | 0 |
| 15 | MASTER OF SCIENCE (ANALYTICAL CHEMISTRY) | मास्टर ऑफ सायंस (एॅनॅलिटिकल केमेस्ट्री) | 35000 | 35000 | 15000 | 15000 |
| 16 | MASTER OF SCIENCE (CHEMISTRY) | मास्टर ऑफ सायंस (केमेस्ट्री) | 35000 | 35000 | 15000 | 15000 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 17 | MASTER OF SCIENCE (COMPUTER SCIENCE) | मास्टर ऑफ सायंस (कंप्युटर सायंस) | 35000 | 35000 | 15000 | 15000 |
| 18 | MASTER OF SCIENCE (HOME SCIENCE - CLINICAL NUTRITION AND DIETETICS) | मास्टर ऑफ सायंस (होम सायन्स - क्लिनिकल न्युट्रीशन अँड डाइटटिक्स) | 35000 | 35000 | 15000 | 0 |
| 19 | MASTER OF SCIENCE (HOME SCIENCE - EARLY CHILDHOOD EDUCATION) | मास्टर ऑफ सायंस (होम सायन्स - अर्लि चाइल्डहुड एज्युकेशन) | 35000 | 35000 | 15000 | 15000 |
| 20 | MASTER OF SCIENCE (HOME SCIENCE - EXTENSION EDUCATION) | मास्टर ऑफ सायंस (होम सायन्स - एक्सटेंशन अँण्ड एज्युकेशन | 35000 | 35000 | 15000 | 15000 |
| 21 | MASTER OF SCIENCE (HOME SCIENCE - FOOD SCIENCE AND NUTRITION) | मास्टर ऑफ सायंस (होम सायन्स - फुड सायंस अँड न्युट्रीशन) | 35000 | 35000 | 15000 | 15000 |
| 22 | MASTER OF SCIENCE (HOME SCIENCE - HUMAN DEVELOPMENT) | मास्टर ऑफ सायंस (होम सायन्स - ह्युमन डेव्हलपमेंट) | 35000 | 35000 | 15000 | 15000 |
| 23 | MASTER OF SCIENCE (HOME SCIENCE - NUTRITION AND FOOD PROCESSING) | मास्टर ऑफ सायंस (होम सायन्स – न्युट्रीशन अँड फुड प्रोसेसिंग) | 35000 | 35000 | 15000 | 15000 |
| 24 | MASTER OF SCIENCE (HOME SCIENCE - RESOURCE MANAGEMENT AND ERGONOMICS) | मास्टर ऑफ सायंस (होम सायन्स - रीसोर्स मॅनेजमेंट अँड अर्गोनॉमिक्स) | 35000 | 35000 | 15000 | 15000 |
| 25 | MASTER OF SCIENCE (HOME SCIENCE - RESOURCE MANAGEMENT AND INTERIOR DESIGN) | मास्टर ऑफ सायंस (होम सायन्स - रीसोर्स मॅनेजमेंट अँड इंटेरियर डिझाईन) | 35000 | 35000 | 15000 | 15000 |
| 26 | MASTER OF SCIENCE (HOME SCIENCE - TEXTILE SCIENCE AND APPAREL DESIGN) | मास्टर ऑफ सायंस (होम सायन्स - टेक्सटाईल सायंस अँड अपैरल डिझाईन) | 35000 | 35000 | 15000 | 15000 |
| 27 | MASTER OF SCIENCE (MICROBIOLOGY) | मास्टर ऑफ सायंस (मायक्रोबॉयलॉजी) | 35000 | 35000 | 15000 | 15000 |
| 28 | MASTER OF SCIENCE (SPECIALIZED DIETETICS) | मास्टर ऑफ सायंस (स्पेशलाइजड डाइटटिक्स) | 35000 | 35000 | 15000 | 15000 |

**Faculty :** **Commerce And Management**

| S. No. | Name of Course in English | Name of Course in Marathi/Hindi | Extension New Faculty | Extension New Course | Extension New Subject | Extension Additional Division |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | B.COM. COMPUTER APPLICATION | बी. कॉम. कम्प्युटर अप्लिकेशन | 0 | 50000 | 0 | 0 |
| 2 | B.COM. MANAGEMENT STUDIES | बी. कॉम. मॅनेजमेन्ट स्टडीज | 100000 | 100000 | 100000 | 100000 |
| 3 | BACHELOR OF COMMERCE (ACCOUNTANCY AND FINANCE) | बॅचलर ऑफ कॉमर्स (अकाउंटंसी अँड फायनांस) | 35000 | 35000 | 15000 | 15000 |
| 4 | BACHELOR OF COMMERCE (ACCOUNTANCY, FINANCE AND INSURANCE) | बॅचलर ऑफ कॉमर्स (अकाउंटंसी , फायनांस अँड इन्शुरन्स) | 35000 | 35000 | 15000 | 15000 |
| 5 | BACHELOR OF COMMERCE (B.COM.) | बॅचलर ऑफ कॉमर्स (बी. कॉम.) | 35000 | 35000 | 15000 | 15000 |
| 6 | BACHELOR OF COMMERCE (BANKING AND FINANCE) | बॅचलर ऑफ कॉमर्स (बँकींग अँड फायनांस) | 0 | 0 | 0 | 0 |
| 7 | BACHELOR OF COMMERCE (COMPANY LAW) | बॅचलर ऑफ कॉमर्स (कंपनी लॉ) | 0 | 0 | 0 | 0 |
| 8 | BACHELOR OF COMMERCE (COMPUTER APPLICATIONS) | बॅचलर ऑफ कॉमर्स (कम्प्युटर अप्लीकेशन) | 0 | 50000 | 0 | 0 |
| 9 | BACHELOR OF COMMERCE (COSTING) | बॅचलर ऑफ कॉमर्स (कॉस्टिंग) | 0 | 0 | 0 | 0 |
| 10 | BACHELOR OF COMMERCE (FINANCIAL ACCOUNTING AND AUDITING) | बॅचलर ऑफ कॉमर्स (फायनॅनशियल अकाउंटिंग अँड ऑडीटिंग) | 0 | 0 | 0 | 0 |
| 11 | BACHELOR OF COMMERCE (MARKETING MANAGEMENT) | बॅचलर ऑफ कॉमर्स (मार्केटिंग मॅनेजमेंट) | 0 | 0 | 0 | 0 |
| 12 | BACHELOR OF COMMERCE (SECRETARIAL PRACTICE AND OFFICE MANAGEMENT) | बॅचलर ऑफ कॉमर्स (सेक्रेट्रिअल प्रक्टिस अँड ऑफिस मॅनेजमेंट) | 0 | 0 | 0 | 0 |
| 13 | BACHELOR OF COMMERCE (TOURISM AND TRAVEL MANAGEMENT) | बॅचलर ऑफ कॉमर्स (टुरीजम अँड ट्रॅव्हल मॅनेजमेंट) | 0 | 0 | 0 | 0 |